## प्रमाणपत्र

श्री जयवंत मा.दळवी, यांनी ' श्रीज्ञानदेवीतील व्यक्तिचित्रणांचा अभ्यास ' हा प्रबंध शिवाजी विद्यापीठातील मराठी विषयाच्या एम.फिल. पदवीसाठी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सादर केलेला आहे.

श्री जयवंत मा.दळवी, यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली हा शोध-प्रबंध स्वतंत्ररीत्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

मार्गदर्शक

(डॉ. वसंत स. जोशी )

माजी पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख,

किसनवीर महाविद्यालय, वाई.

कोल्हापूर ।

दिनांक : २४ : ६ : १९९३.

# प्रतिज्ञा

'श्रीज्ञानदेवीतील व्यक्तिचित्रणांचा अभ्यास' हा शोध-प्रबंध मी प्रत्यक्ष पाहणी आणि माहितीच्या आधारे शिवाजी विद्यापीठातील मराठी विषयाच्या एम्.फिल्.(मराठी) पदवीकरिता अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सादर करीत आहे.

मी हा शोध-प्रबंध माझे मार्गदर्शक डॉ.वसंत स.जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली वास्तव स्वरुपातील उपलब्ध माहितीच्या आधारे लिहिला आहे. आणि श्रीज्ञानदेवीतील व्यक्तिचित्रणांचे सर्वसाधारण स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अभ्यासक

( जयवंत मा.दळवी )

कोल्हापूर ।

दिनांक :२४:६:१९९३ .

"श्रीज्ञानदेवीतील व्यक्तिचित्रणांचा अभ्यास"

## अ नु क्र म णि का


पृष्ठ क्रमांक

- ऋणनिर्देश
- भूमिका
- प्रकरण - १ - श्रीज्ञानदेव जीवनचरित्र व कार्य ----- १ ते २१
  - प्रास्ताविक
  - ज्ञानदेवांचे आई-वडील
  - ज्ञानदेवांचा जन्मकाळ
  - ज्ञानदेवांची गुरुपरंपरा
  - ज्ञानेश्वरकालीन समाजजीवन
  - ज्ञानेश्वरकालीन धार्मिक जीवन
  - ज्ञानदेव व नामदेव भेट
  - ज्ञानदेवांची ग्रंथरचना व स्फुट रचना
    - ज्ञानेश्वरी
    - अमृतानुभव
    - चांगदेव पासष्टी
    - ज्ञानदेवांचे अभंग
  - ज्ञानदेव व वारकरी संप्रदाय
  - ज्ञानेश्वर व संतमंडळ
  - समारोप

पृष्ठ क्रमांक

- प्रकरण - २ - महामानव श्रीकृष्ण - - - - - - - २२ ते ४१
प्रास्ताविक
श्रीकृष्णाची विवेकनिष्ठ दूरदृष्टी
श्रीकृष्णाचे स्तुतीचातुर्य
स्वधर्माचरण करणारा श्रीकृष्ण
श्रीकृष्णाचे मित्रप्रेम
भक्तवत्सल श्रीकृष्ण
श्रीकृष्णाचा वक्तृत्व गुण
श्रीकृष्णाचे परमेश्वरी सामर्थ्य
श्रीकृष्णाचे निरुपाधिक रुपावरील प्रेम
आनंदाने उंचबळणारे कृष्ण
आदर्श गुरु श्रीकृष्ण
भावविवश श्रीकृष्ण
समारोप
- प्रकरण - ३ - कृष्णशिष्य ज्ञानी श्रोता अर्जुन - - - - - ४२ ते ६२
प्रास्ताविक
जीवनविषयक व्यापक विचार करणारा
योध्दा अर्जुन
गुरुजन व वडीलधाऱ्या मंडळींविषयी आदरभाव
बाळगणारा अर्जुन
अर्जुनाचे मित्रप्रेम
अर्जुनाची जिज्ञासूवृत्ती
अर्जुनाची श्रीकृष्णाविषयीची नम्रबुध्दी
अर्जुनाचे गुरुप्रेम
आत्मपरीक्षण करणारा अर्जुन
अर्जुनाचे प्रश्न विचारण्याचे कौशल्य
चिकित्सकवृत्तीचा अर्जुन

पृष्ठ क्रमांक

अर्जुनाचा प्रामाणिकपणा
अर्जुनाचे श्रोतृत्व
आदर्श शिष्य अर्जुन
समारोप

- प्रकरण - ४ - कर्तव्यनिष्ठ सेवक आणि कृष्णभक्त संजय व पुत्रमोहांध पिता धृतराष्ट्र - - - ६३ ते ८४
संजय
प्रास्ताविक
सौन्दर्यपूजक संजय
विनयशीलवृत्तीचा संजय
व्यासांविषयीचा प्रेमभाव जागृत ठेवणारा संजय
संजयाचे निवेदन कौशल्य
देहभान हरपलेला संजय
नैतिकबळ प्राप्त झालेला संजय
संजयाची विद्वता
धृतराष्ट्र
प्रास्ताविक
पुत्रस्नेहे मोहित धृतराष्ट्र
आशावादी धृतराष्ट्र
दुर्दैवी धृतराष्ट्र
आतही आंधळा
अपरिवर्तनीय अरसिकश्रोता
समारोप

- प्रकरण - ५ - श्रीज्ञानदेव आणि श्रीगुरु निवृत्तिनाथ - - - - - ८५ ते १०६

पृष्ठ क्रमांक

श्रीज्ञानदेव

प्रास्ताविक

ज्ञानेश्वरांचे सुसंस्कृत व्यक्तिमत्व

अभिजात नम्रता

मराठी भाषेबद्दलचा अभिमान

ज्ञानेश्वराचे अतृप्त मातृप्रेम

ज्ञानदेवांचा गुरुसामर्थ्यावरील अढळ विश्वास

ज्ञानदेवांचा वक्तृत्व गुण

ज्ञानेश्वर आदर्श शिष्य

ज्ञानेश्वरांची रसवृत्ती

ज्ञानेश्वराचे काव्यात्म व्यक्तिमत्व

मानवतावादी ज्ञानेश्वर

श्रीनिवृत्तिनाथ

प्रास्ताविक

इच्छित कामना पूर्ण करणारे श्रीनिवृत्तिनाथ

कारुण्याची मूर्ती निवृत्ति माझा

गुरुमाऊली श्रीनिवृत्तिनाथ

श्रीनिवृत्तिनाथ हेच परब्रह्म

श्रीनिवृत्तिनाथ चित्सूर्य

समारोप

- प्रकरण - ६ - समारोप - - - - १०४ ते ११५

[redacted] ग्रंथ सूची - - - - - ११६ ते १२१

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या ' एम्.फिल्. (मराठी ) पदवीसाठी माझा ' श्रीज्ञानदेवीतील व्यक्तिचित्रणाचा अभ्यास ' हा लघु प्रबंध तयार करण्याच्या कामी व माझ्या अभ्यासाला दिशा देण्याच्या कामी ज्या व्यक्तींचे सहकार्य मिळाले त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

प्रबंधिकेच्या विषय निवडीपासून तहत या प्रबंधिका विषयाचे संशोधन कार्य पूर्ण होईपर्यन्त माझे मार्गदर्शक मराठी प्राचीन साहित्याचे उपासक गुरूवर्य डॉ.वसंत स.जोशी यांचे स्नेहयुक्त अनमोल असे मार्गदर्शन लाभले. सरांनी प्रस्तुत प्रबंधिका विषयाबाबत वारंवार संशोधनात्मक चर्चाही केलेली आहे. त्याच्या वाचण्यात या प्रबंधिका विषयाबाबत नवनवीन पुस्तके येतात ती संदर्भ पुस्तके मला उपलब्ध करून दिलेली आहेत. यामुळेच माझ्या प्रबंधिकेचे कार्य वेळेत झालेले आहे. सरांनी संशोधनाची योग्य दिशा दाखवून संशोधनाविषयीची आवड माझ्या मनात निर्माण केलेली आहे .सरांचे हे ऋण न फिटणारे आहे. तेव्हा मी त्यांच्या ऋणातच राहणे अधिक पसंत करतो.

सरांच्या घरी मार्गदर्शनासाठी गेल्यानंतर त्यांच्या घरातील लहान-थोरांनी नेहमीच स्वागत केले. अविस्मरणीय सहकार्य दिले. या बद्दल मी सरांच्या घरातील लहान थोरांचा अत्यंतिक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठ,मराठी विभागप्रमुख गुरूवर्य डॉ.ल.रा.नसिराबादकर, त्यांचा सहकारी प्राध्यापक वर्ग ,कर्मचारीवर्ग,महावीर महाविद्यालयाच्या ग्रंथपाल, कर्मचारीवर्ग,माझे बलस्थान माता-पिता-बंधु,आणि मित्रवर्ग या सर्वांनी जे सहकार्य केले याबद्दल मी त्यांचा अत्यंतिक ऋणी आहे.

माझ्या प्रबंधिकेचे टंकलेखन श्रीयुत सावंत बाळकृष्ण रा.,कोल्हापूर यांनी वेळेत करुन दिल्याबद्दल मी त्याचा आभारी आहे.

कोल्हापूर ।	( जयवंत मा.दळवी )

दिनांक : २४ : ६ :१९९३ ।

# भूमिका

## अभ्यासविषयाचे औचित्य --

मराठी साहित्यात आणि मराठी माणसाच्या जीवनात ज्ञानदेवीचे स्थान अद्वितीय आहे. ज्ञानदेवी हा उच्च विचार प्रतिपादन करणारा तत्वज्ञानपर ग्रंथ आहे. त्या बरोबरीने हळुवार चित्तवृत्ती पल्लवीत करणारा काव्यग्रंथही आहे. अध्यात्म आणि काव्य यांचे सुरेख मिश्रण समतोलपणे ज्ञानदेवीत झालेले आहे. ज्ञानदेवी हा ग्रंथ मराठी भाषेतील ग्रंथाचा राजा आहे. ग्रंथराजमाऊली असाही ज्ञानदेवीचा उल्लेख करतात. मराठी सारस्वतात ज्ञानेश्वरीची बरोबरी करणारा दुसरा ग्रंथ निर्माण झालेला नाही. अनेक विषयाचा अंतर्भाव करुन विदग्धरसवृत्तीचा आविष्कार करणारा ज्ञानदेवीसारखा दुसरा ग्रंथ मराठी साहित्यात नाही.

ज्ञानेश्वरीच्या संहिता निश्चितीच्या दिशेपासून तहत ज्ञानेश्वरीच्या संदर्भ सूचीच्या नव्या दिशेपर्यन्त ज्ञानेश्वरीच्या अभ्यासविषयांचा आवाका प्रचंड आहे. अनेक वाङ्‌मयीन ,भाषावैज्ञानिक,संशोधनपर व चिंतनपर विषयांना प्रसवणारा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी सारस्वतातील 'वेरुळचे' देशिकार लेणे' आहे.

मूळ गीतेतील कालोचित असा नवा विचार ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत मांडलेला आहे. त्यासाठी संक्षेपाचे धोरण स्वीकारणे अपरिहार्य ठरलेले आहे. काही श्लोकांवर संक्षिप्त भाष्य तर 'अहिंसा' सारख्या पदावर विस्तृत असे भाष्य केलेले आहे. ज्ञानदेवांचे भाष्य प्रतिपदपाठ पध्दतीचे नसून संवादसुखाचे आहे. या संवादसुखामुळे ज्ञानेश्वरी रंजक, रोचक,प्रबोधक व वाचनीय झालेली आहे. वारकरी लोक ज्ञानेश्वरीचा व ज्ञानेश्वरांचा 'माऊली' असा उल्लेख करतात. वारकऱ्यांच्या दिवसाची सुरुवात ज्ञानेश्वरीच्या वाचनाने होते व दिवसाची समाप्ती ज्ञानदेवीच्या मानसपूजनाने होते.

वारकऱ्यांमध्ये ज्ञानेश्वरी आणि ज्ञानेश्वर यांच्याविषयी अपार पूज्यबुध्दी आहे. वारकरी कीर्तनात कीर्तनकार प्रामुख्याने संत तुकारामांचा किंवा संत नामदेवांचा अभंग कीर्तनासाठी घेतात. परंतु विषयाच्या स्पष्टीकरणासाठी ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा समर्पक वापर करतात. ज्ञानेश्वरीचा आधार दिला नाही तर कीर्तनात काही तरी सांगायचे राहिलेले आहे अशी रुखरुख कीर्तनकाराला लागते. आणि ज्ञानेश्वरीचा उल्लेख झाला नाही याची खंत भाविकांना वाटते. इतका ज्ञानेश्वरी आणि वारकरी यांचा अनोन्यसंबंध प्रस्थापित झालेला आहे. ज्ञानेश्वरीवरील प्रवचनाला अबालवृध्दांची गर्दी होते. अत्यंतिक श्रध्देने प्रवचनाचे श्रवण करतात. ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्रातील एखाद्या हृदयद्रावक प्रसंगाचे वर्णन असेल तर डोळ्यातून अश्रूही ढाळतात. प्रवचन संपल्यानंतर प्रवचनकाराच्या मुखातून प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊली बोलली म्हणून प्रवचनकाराच्या चरणावर मस्तक ठेवतात. वयातील अंतर नष्ट होते. जातीभेदाचे कोंडाळे उडून जाते. अहंकार जळून जातो. मी पणा गळून जातो आणि शुध्द मानवतेचे नाते शिल्लक राहते. अशी प्रचीती यावेळी येते. मराठी माणसाच्या हृदयामध्ये ज्ञानेश्वरीचे स्थान अढळ आहे. आजही त्या स्थानाला धक्का बसलेला नाही, दिवसेंदिवस ते अधिकच अढळ होत चालले आहे.

ज्ञानदेवीविषयी वारकऱ्यांच्या मनामध्ये पूज्यबुध्दी आहे. तद्वत ज्ञानदेवीच्या अभ्यासकांच्या मनातही ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी याविषयी आदरभाव आहे. अनेकवर्षे ज्ञानदेवीचे अध्ययन करूनही ज्ञानेश्वरी पूर्णपणे समजलेली नाही अशी स्पष्ट कबूली अनेक अभ्यासकानी दिलेली आहे. अभ्यासकांनाही ज्ञानेश्वरी व्यापून उरलेली आहे. नवनवीन अभ्यासपध्दतीचे नवनवीन प्रयोग ज्ञानेश्वरीवर करतात आणि ते यशस्वीही होतात. अभ्यासकांच्यादृष्टीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अभ्यासविषयाची खाणच आहे.

पूर्वाभ्यासाचे स्वरूप --

ज्ञानेश्वरीचा अनेक अंगानी शंभरवर्षे अभ्यास होत राहिलेला आहे आणि पुढे होणार आहे. कारण गीता जशी नित्यनूतन आहे तद्वत ज्ञानेश्वरीसुध्दा नित्यनूतन आहे. या ग्रंथाच्या जन्मापासून आजतागायत हा ग्रंथ अभ्यासकाना नवनवीन विषय पुरवत आलेला आहे. ज्ञानेश्वरीतील एक एक ओवी प्रबंधाचा विषय व्हावी एवढे सामर्थ्य या ओव्यांमध्ये आहे.

ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा अभ्यास अनेकविध अंगानी झालेला आहे. प्राचीन संतमंडळीनी व अर्वाचीन चिकित्सक अभ्यासकांनी या ग्रंथाची आवर्जून दखल घेतलेली आहे. संत नामदेवांनी ग्रहण,अनुसरण व विस्तरण या प्राचीन अप्रत्यक्षापध्दतीने अनुभवाच्यापातळीवर ज्ञानदेवीचे अध्ययन केलेले आहे. ज्ञानदेवीविषयी आपला अनुभवात्मक स्वानुभव व्यक्त करताना नामदेव म्हणतात ' ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ' एक तरी ओवी अनुभवावी । संतमहात्म्यानी ज्ञानेश्वरीची चिकित्सा करण्याऐवजी ज्ञानेश्वरीतील सिध्दांताचा पडताळा आपल्या जीवनाच्या संदर्भात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकनाथानी ज्ञानेश्वरीतील अपपाठ काढून टाकून ज्ञानेश्वरीची संहिता शुध्द केली.त्यांच्या या वाङ्मयीन कामगिरीने ते मराठीतील पहिले संशोधक ठरले.

आज ज्ञानेश्वरीची फार मोठया प्रमाणात चिकित्सा होत आहे. ज्ञानेश्वरीतील अनेकविषय स्वतंत्र अभ्यासाचे विषय म्हणून अभ्यासले जात आहेत. ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या अभ्यासाच्या बरोबरीने ज्ञानेश्वरांचा काल,त्यांचे व्यक्तिमत्व, काव्यविषय औचित्य,अनौचित्य यांचा विचार अध्ययनात होत आहे. ज्ञानेश्वरी ही एक समग्र वस्तु मानून तिच्यातील तत्वज्ञान,ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्व,त्यांचा दृष्टीकोन ,ज्ञानेश्वरीच्या लेखनकाळाची परिस्थिती ,ज्ञानेश्वर परिस्थितीचा ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वविकासावर व ज्ञानेश्वरीच्या लेखनावर झालेला परिणाम, पूर्वकृतीचे परिणाम इत्यादी दृष्टिने ज्ञानेश्वरीचा अभ्यास झालेला आहे.

ज्ञानेश्वरांच्या चरित्राचा भाविक चरित्रकार या नात्याने ल.रा.पांगारकर, ना.ह.भागवत,, शं.बा.दांडेकर आणि ज्ञानदेव यांचे चरित्र व वाड्.मय याकडे शुध्दपारमार्थिक दृष्टीने पाहणारे रा.द.रानडे इत्यादींचे ज्ञानदेवांच्या चरित्राचा अभ्यास केलेला आहे. भा.दा.आळतेकर यांनी ज्ञानदेवांच्या चरित्रामधून चमत्कार वगळूनही त्यांचे चरित्र सुरस करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शं.गो.तुळपुळे यांनी सहृदयतेने ज्ञानदेव चरित्राची चिकित्सा केलेली आहे. डॉ.शं.गो.वाळिंबे यांच्या ज्ञानदेव चरित्रात चिकित्सा असली तरी या चिकित्सेला आतून श्रध्देचे अस्तर आहे. प.दि.चित्रे यांनी आपले ज्ञानेश्वर चरित्रात ज्ञानेश्वरांना समाज व्यवस्थेतील अन्यायाची हकालपट्टी करणारे क्रांतीकारक पुरुष मानलेले आहेत.

आधुनिक काळात विविध दृष्टीकोनातून ज्ञानेश्वरीचा अभ्यास केलेला आहे व करीतही आहेत. वाड्.मयदृष्ट्या रा.शं.वाळिंबे यांनी ` ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ति ` या ग्रंथात ज्ञानेश्वरीतील काव्याचे सर्वांगीण विवेचन केलेले आहे. ज्ञानेश्वरीतील तत्वज्ञानाचा विचार ` ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान ` या ग्रंथात डॉ.शं.दा. पेंडसे यांनी केलेला आहे. ज्ञानदेवीच्या तत्वज्ञानाचे एक श्रेष्ठ भाष्यकार म्हणून रा.द.रानडे यांचा उल्लेख करता येईल. डॉ.शं.गो.तुळपुळे यांनी पांच संतकवी या ग्रंथात ज्ञानदेवांचा परामर्श घेतलेला आहे. डॉ.वि.भि.कोलते यांनी ज्ञानेश्वर व चक्रधर यांच्या तत्वज्ञानाचे तुलनात्मक विवेचन केलेले आहे. आधुनिक अर्थाने ज्याला भाषाशास्त्रीय अभ्यास म्हणता येईल असा सर्वांगीन अभ्यास मु.ग.पानसे यांनी ` ज्ञानेश्वरीची भाषिक वैशिष्ट्य ` या प्रबंधात केलेला आहे. वि.का. राजवाडे यांनी ज्ञानेश्वरीचे व्याकरण ` हा ग्रंथ १९०९ मध्ये लिहून मराठी भाषेच्या ऐतिहासिक व्याकरणाचा पायाच घातला. ज्ञानेश्वरीची एकनाथपूर्व प्राचीन संहिता प्रा.पां.ना. कुलकर्णी यांनी सिध्द केलेली आहे. ` ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ` या ग्रंथात ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाच्या अनेक दिशा दाखविलेल्या आहेत.

ज्ञानेश्वरीचा धार्मिक,राजकीय,सामाजिक, भाषाविज्ञानिक अंगाने विस्तृत अभ्यास झालेला आहे. हे विषय जसे ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचे विषय ठरलेले आहेत. तसाच व्यक्तिदर्शन हा एक अभ्यासाचा विषय झालेला आहे.परंतु

ज्ञानेश्वरीचा व्यक्तिदर्शनाच्या अंगाने अत्यात्प अभ्यास झालेला आहे. द.ना. गोखले व स.के.नेऊरगावकर यांनी ज्ञानेश्वरीतील अर्जुनाचे श्रोता,ज्ञानीभक्त व मित्र यादृष्टीने व्यक्तिचित्र कसे वठलेआहे याचे सोदाहरण विवेचन केलेले आहे. ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्ण ज्ञानदेवांनी कसा रंगविलेला आहे याचे दर्शन ल.रा.पांगारकर व म.ग.सहस्त्रबुध्दे यांनी घडविलेले आहे. तर श्री देवीदास बागूल यांनी ज्ञानदेवांच्या मित्रकल्पनेचे ज्ञानेश्वरांनी केलेले हृदयगंम विषयांतर व कल्पनाविलास असे वर्णन केलेले आहे हे सर्व लेखन स्फुट स्वरुपात पुरुषार्थ, प्रसाद,मुमुक्षु,सत्यकथा यासारख्या नियतकालिकांमधून झालेले आहे. ज्ञानेश्वरीतील व्यक्तिचित्रणाच्या संशोधनात्मक विस्तृत अभ्यासासाठी हे लेखन किरकोळ व त्रोटक आहे म्हणून ज्ञानेश्वरी हाच एक मोठा आधार मानलेला आहे.

प्रस्तुत अभ्यासाची दिशा --

स्वजनांच्या मोहाने मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाला कर्मप्रवृत्त करण्यासाठी कुरुक्षेत्रावर युध्दाचा कोलाहल माजला असताही श्रीकृष्णांनी सांगितलेले तत्वज्ञान म्हणजे गीता होय. गीतेमध्ये ज्ञान-भक्ती व कर्म याविषयीचे प्रतिपादन केलेले आहे. कर्मसंन्यासापेक्षा कर्मफलत्यागानेच मनुष्यास शांती लाभते असे गीताकारांनी म्हटले आहे.

ज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरीत स्वधर्माचरण व कर्मफलत्याग या विषयांवर विस्तृत चर्चा केलेली आहे. कारण तत्कालीन सामाजिक व धार्मिक जीवनात निष्क्रिय कर्मकांडाचे स्तोम माजले होते. धार्मिक क्षेत्रात अज्ञान,स्वार्थ आणि अंधश्रध्दा यांचा प्रादूर्भाव झालेला होता. लोकांच्या मनात अविचारांनी थैमान घातलेले,अज्ञान व भीतीपोटी हेंदरी सेंदरी देवतांची भक्ती करुन लोक धन्यता मानू लागले होते. स्वकर्तव्याचा विसर पडलेल्या समाजाला त्यांचा स्वधर्म सांगून कार्यप्रवृत्त करण्यासाठी कर्मयोग व कर्मफलत्याग योग हे विषय विस्तारपूर्वक सांगितलेले आहेत.

मराठी भाषेत गीताभाष्य करण्याचे पहिले धाडस ज्ञानदेवानी केलेले आहे. मातृभाषेतून दिलेले ज्ञान त्या समाजाला अवगत करण्यास वेळ लागत नाही हे

ज्ञानदेवानी प्रथम जाणले असावे म्हणून त्यांनी मराठी भाषेचा आवलंब केलेला आहे. मराठी बोलणा-याची संख्या संस्कृत जाणणा-यापेक्षा अनेकपटीने होती. लोकजीवनातील परिचित असे दृष्टांत सांगून हा विषय रंजक व उद्‌बोधक केलेला आहे.

ज्ञानेश्वरांच्या कवित्वशक्तीचा प्रत्यय हा अधिक स्पष्टपणे त्यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखांमधून येतो. विशिष्ट विचारांची चर्चा चालली असता त्या त्या व्यक्तींच्या मनातील भावनांची आंदोलने त्यांनी मोठ्या खुबीने चित्रित केलेली आहेत. त्यामुळे त्या व्यक्तिरेखा प्रभावी ठरलेल्या आहेत.ही ज्ञानदेवांची नवनिर्मिती आहे. तद्‌विषयांच्या कुतूहलातून त्या व्यक्तिरेखांचा शोध घेण्याची इच्छा माझ्या मनात निर्माण झाली.गेल्या सातशे वर्षापासून ज्ञानदेवीने मराठी मनाला संजीवन दिलेले आहे .तिच्या लेखनाचे निमित्त जरी गीताभाष्य एवढे असले तरी तेवढया पुरतेच या ग्रंथाचे स्वरूप मर्यादित नाही. ज्ञानदेवांच्या नवोन्मेषशाली प्रज्ञेचा तो चैतण्यशाली असा काव्यात्मक आविष्कारही आहे. मूळ गीतेतील विचार,प्रसंग व व्यक्ती यांना ज्ञानदेव आपल्या स्वतंत्र प्रज्ञेने पाहतात आणि त्याचे काव्यात्मक असे चित्रण करतात. मूळ गीतेतील व्यक्तिचित्रणांमध्ये ज्ञानदेवानी आपल्या अलौकिक प्रतिभेचे रंग भरले असून त्यांना आगळी झळाळी प्राप्त झालेली आहे. मूळ गीतेतील व्यक्तिरेखांच्या मनातील भावभावनांची आंदोलने ज्ञानदेवानी अत्यंत प्रत्ययकारी पध्दतीने रंगविलेली असल्याकारणे ज्ञानदेवीला काव्यात्मकरूप प्राप्त झालेले आहे, त्यामुळे ज्ञानदेवीतील ही व्यक्तिचित्रे अधिक जीवंत वाटतात, तितकीच ती रंजक व उद्‌बोधकही वाटतात. ज्ञानेश्वरीचा मुळातून अभ्यास करुन मूळ गीतेतील व्यक्तिचित्रणांशी तुलना करीत ज्ञानदेवप्रणीत व्यक्तिरेखांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधिकेत केलेला आहे.